श्री हरिष धार्मिक, उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचे कार्यालय

प्र.क्र २५/किर.-८०/२०१२-१३
मौजा :- पिपरी (मेघे)

# आदेश
(पारीत दिनांक १५/०१/२०१३)

अर्जदार **श्री राजकुमार रामरावजी देशमुख व इतर १** रा. वर्धा यांनी या कार्यालयाला दिनांक **१०/१२/२०१२** ला अर्ज करून त्यामध्ये नमुद केले की, मौजा पिपरी (मेघे) येथिल भूमापन क्रमांक ५९/१ यामधील प्लॉट क्र. ९, १० ते, १४, २५ ते ३२, ३४, ५०, ६२ व ६३ आराजी अनुक्रमे २०२.५०, १८४.५०, १८४.५०, १८४.५०, १८४.५०, १८४.५०, २४६.००, १८४.५०, १८४.५०, १८४.५०, १८४.५०, १८४.५०, १८४.५०, १८४.५०, १८४.५०, १९८.७५ व १६५.०० चौ.मि. अशी एकुण **३३७१.७५** चौ.मि. क्षेत्र स्वत:चे मालकिचे असून त्यांना वैयक्तिक कामाकरीता एकत्र करावयाचे असल्याचे अर्जात नमुद केले आहे.

अर्जदाराचे अर्जाचे अनुषंगाने नगर रचनाकार, वर्धा, ग्रामपंचायत पिपरी व तलाठी पिपरी यांचा अहवाल या कार्यालयाचे पत्र क्र. सिरस्तेदार/उविअ/कावि-**३१५५** दिनांक १४ डिसेंबर, २०१२ अन्वये मागविण्यात आला.

या कार्यालयाचे पत्र क्र. सिरस्तेदार/उविअ/कावि-**३१५८** दिनांक १४ डिसेंबर, २०१२ अन्वये जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात आला. आदेशाचे दिनांकापर्यंत आक्षेप प्राप्त झाला नाही.

प्रकरणात नगर रचनाकार, वर्धा यांनी त्यांचे पत्र क्र. **१७५८** दि. **२७/१२/२०१२** अन्वये सदर अकृषक अभिन्यासाला रहिवासाची शिफारस केलेली नसल्याने मंजूरीची शिफारस करता येवू शकत नाही असे नमुद केले आहे.

सचिव ग्रामपंचायत, पिपरी (मेघे) यांनी त्यांचे पत्र क्र. **३५** दि. **१४/०१/२०१३** अन्वये सदर भूखंडांचे एकत्रिकरण करण्यास हरकत नसल्याचे नमुद केले आहे.

तलाठी पिपरी (मेघे) यांचा अहवाल त्यांचे पत्र दिनांक **२०/१२/२०१२** अन्वये अहवाल सादर केला आहे तसेच मंजूरीस ना हरकत सादर केले आहे.

सदर अर्जामध्ये नमुद भूमापन क्र. **५९/१** याला तहसिलदार वर्धा यांचे प्र.क्र. ९६/एनएपी-३४/८८-८९ आदेश दि. **१८/०५/१९८९** अन्वये अकृषक मंजूरी प्रदान केलेली आहे.

अर्जदार यांनी सदर भूखंड क्र. ९, १० ते १४, २५ ते ३२, ३४, ५०, ६२ व ६३ अशी १८ भूखंडांची विक्री दस्त क्र. **६५४५** दिनांक **०२/०८/२०१२** अन्वये नोंदणीकृत पद्धतीने केलेली आहे.

ATTESTED

... २/-

या कार्यालयाला प्राप्त नाहरकत तसेच प्रकरणात अर्जदाराने सहपत्रित केलेली सर्व कागदपत्रे या सर्व बाबींचा विचार करता मौजा पिपरी (मेघे) भूमापन क्रमांक **५९/१** या मंजूर अभिन्यासातील भूखंड क्र. **९** आराजी **२०२.५० चौ.मि., १० ते १४** आराजी १८४.५० चौ.मि., २५ आराजी **२४६.००, २६, २७, २८ ते ३२ व ३४** आराजी प्रत्येकी **१८४.५० चौ.मि., ५०** आराजी **१९८.७५** चौ.मि. व भू.क्र. **६२ व ६३** आराजी **१६५.०० चौ.मि.** अशी एकुण **३३७१.७५** चौ.मि. नविन मंजूर नकाशाप्रमाणे एकत्रिकरण करण्यास परवानगी **श्री राजकुमार रामरावजी देशमुख व इतर १** रा. वर्धा यांना खालील शर्ती व अटींचे अधीन राहून प्रदान करण्यात येत आहे.

आदेश पारीत संबंधितांना कळवा.

<u>शर्ती व अटी</u>

१. सदर जागा फक्त निवासी वापराकरीता अनुज्ञेय राहील.

२. अकृषक आदेशातील सर्व अटी जशाच्या तश्या लागू राहतील.

३. सदर क्षेत्राकरीता शासन मंजूर ब व क वर्ग नगर पालिकांकरीता लागू असलेली बांधकाम विकास नियंत्रण नियमावली लागू आहे. त्यामधील नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

४. अर्जदाराला मूळ अकृषक आदेशातील सर्व अटी जशाच्या तशा लागू राहतील.

५. एकत्रिकरणाचे नकाशा व बांधकामास स्थानिक मंजूर प्राधिकरण व मा. जिल्हाधिकारी, वर्धा यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

६. बांधकाम करण्यापूर्वी सदर जागेची मोजणी करून घेणे बंधनकारक राहील.

७. सदर जागेवर बांधकाम करतांना अर्जदाराला ग्रामपंचायत **पिपरी (मेघे)** यांचेकडून जागेचा नकाशा मंजूर करणे बंधनकारक राहील. तसेच त्यामधील अटींचे तंतोतंत पालन करावे लागेल.

उपविभागीय अधिकारी,
वर्धा

ATTESTED
Executive Magistrate

**प्रतिलिपी** :- १. तहसिलदार, वर्धा यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.
२. तलाठी, पिपरी (मेघे) तहसिल वर्धा यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.
३. अर्जदार **श्री राजकुमार रामरावजी देशमुख व इतर १** रा. वर्धा यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

उपविभागीय अधिकारी,
वर्धा